संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# भारतीय अर्थकारणाला बळ देणारी घडामोड

**भारत** हा प्रामुख्याने दोन गोष्टींबाबत जगातील सर्वात मोठा देश असल्याचे वारंवार सांगितले जाते. एक म्हणजे सर्वात मोठा लोकशाहीवादी देश आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश म्हणूनही त्याचे वर्णन केले जाते. त्यापेक्षा भारताकडे सांगण्यासारखे काहीच नाही का किंवा या व्यतिरिक्त भारताचा अन्य कुठल्या बाबतीत गौरव होऊ शकतो याचादेखील कधीतरी विचार झाला पाहिजे. सर्वात मोठा लोकशाहीवादी देश भारत आहे याचे कारण आपल्या देशाची लोकसंख्याच सर्वाधिक आहे आणि मग अशावेळी इथली निवडणूक प्रक्रिया अवाढव्य स्वरुपाची असते. सव्वाशे कोटी लोकांपैकी नव्वद कोटी मतदारांसाठी तेवढीच मोठी मतदानाची व्यवस्था राबवावी लागते. परंतु इतकी मोठी लोकसंख्या आणि व्यवस्था असलेल्या या देशाची आणखीही काही वैशिष्ट्ये असू शकतात याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. अमेरिका, रशिया, चीन किंवा जपान, फ्रान्स यासारखी राष्ट्रे विकासाच्या घोडदौडीचा विचार करताना सर्वप्रथम अर्थकारणाच्या फूटपट्ट्या लावत असतात. तिथला भूप्रदेश, लोकसंख्या तिथे लोकशाही आहे की हुकुमशाही आहे या मुद्द्यांना ते देश कधीही फारसे महत्त्व देत नाहीत. त्यापेक्षाही आपापल्या देशाची अर्थव्यवस्था किती मजबूत आहे आणि जगातल्या बाजारपेठेपैकी आपण किती हिस्सा काबीज केला आहे याकडे त्यांचे सर्वाधिक लक्ष असते. अगदी सौदी अरेबियासारखा देशही तिथल्या धार्मिक रीतीरिवाजांमुळे जगाच्यादृष्टीने दुर्लक्षित असला तरी तो आज जगातील एक प्रथम क्रमांकाचा तेलउत्पादक देश आहे आणि या देशाची जगातल्या सर्व देशांना गरज पडत असते. एकेकाळी भारत हा जगातील ज्ञानभांडार असलेला देश होता आणि त्या ज्ञानभांडाराच्या जोरावर या देशामध्ये चांगलीच आर्थिक सुबत्ताही नांदत होती. परकीय आक्रमकांमुळे ती सुबत्ता लयाला गेली पण स्वातंत्र्यानंतरही आपले हे गतवैभव पुन्हा प्राप्त करावे असे फारसे प्रयत्न झाले नाहीत. मात्र १९९० च्या दशकात देशाने आपल्या अर्थकारणाची दिशा बदलली. मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले आणि भारताच्या आर्थिक क्षेत्राची जागतिक स्तरावर नोंद होऊ लागली. एकेकाळी जग भारतीय कंपन्यांकडे किंवा उत्पादनाकडे तुच्छतेने पाहात होते. ते स्वरूप बदलले.

### रिलायन्स इंडस्ट्रीजचा नावलौकिक

अनेक भारतीय कंपन्यांनी जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवायला सुरुवात केली किंबहुना त्या स्पर्धेत तितकेच मोठे सक्षम भागीदार होऊ शकतो हेदेखील सिध्द करून दाखवले. मग अगदी सर्वात मोठा परममहासंगणक बनवणारा भारत माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीचा देश ठरला. इन्फोसिससारख्या कंपनीने आपले वैशिष्ट्य सिध्द केले. तर लक्ष्मी मित्तल यांच्या कंपन्यांनी स्टील उद्योगात आपली कामगिरी सिध्द करून दाखवली. विप्रो, टाटा, बिर्ला, रिलायन्ससारख्या कंपन्यांनी तर या मुक्त अर्थजीवनाचा उपयोग करून स्वतःची उद्योग आणि आर्थिक क्षितिजे खूप विस्तारली. प्रामुख्याने गेल्या पंचवीस वर्षात भारतीय उद्योग विश्वातल्या किमान तीन ते चार लोकांची नावे सर्वात श्रीमंत उद्योगपती म्हणून फोर्ब्ज या मासिकामध्ये प्रसिध्द होऊ लागली आता तर जगातल्या अनेक कंपन्या भारतामध्ये गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक असतातच. शिवाय भारतातल्या प्रमुख कंपन्यांमध्ये आपल्याला भागीदारी करता यावी म्हणूनही पुढाकार घेताना दिसतात. स्वाभाविकपणे गेल्या काही वर्षांत बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतात उद्योग उभारण्यासाठी दाखवलेला पुढाकार दखल घेण्याजोगा आहे. जागतिक स्तरावर दबदबा असलेल्या कंपन्यांवर भारतीय कंपन्यांची आता जेव्हा तुलना होते त्यावेळेला त्याचा निश्चितच अभिमानही वाटू लागतो. यांसदर्भातली अनेक उदाहरणे जरी असली तरीसुध्दा अलिकडच्या एका ताज्या उदाहरणाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. सौदी येथील आरामको ही जगातील सर्वात मोठीतेल उत्पादन करणारी कंपनी मानली जाते. एवढेच नव्हे तर जगातील सर्वात नफा कमावणारी कंपनी म्हणूनही तिचा उल्लेख होतो. अशा या प्रतिष्ठित कंपनीने भारतातल्या रिलायन्स इंडस्ट्रीजच्या रिफायनिंग आणि पेट्रो केमिकल क्षेत्रामध्ये २५ टक्के भागिदारी करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. आज रिलायन्स इंडस्ट्री ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची तेलशुध्दीकरण करणारी किंवा ऑईल रिफायनरी मानली जाते. शिवाय भारतातील सर्वाधिक महसूल कमावणारी कंपनी म्हणूनही तिचा दबदबा आहे. शेअर बाजारातल्या रिलायन्सच्या दोन दिवसाच्या किंमतीचा आधार घेतला तर आज या कंपनीकडे साडेआठ लाख कोटींचे भांडवल आहे.

### लोकशाहीचा नुसताच गजर

अशा या रिलायन्स इंडस्ट्रीबरोबर जगातली सर्वाधिक तेल उत्पादन करणारी कंपनी भागीदारी करण्यासाठी उत्सुकता दाखवत असेल तर ही घटना भारताच्या आर्थिक उन्नतीचे निदर्शक ठरते किंवा भारतीय उद्योग क्षेत्राच्या नावलौकिकात मोठी भर घालणारी म्हणावी लागते. सर्वात मोठी लोकशाही किंवा सर्वाधिक लोकसंख्या या गोष्टी काही देशाच्या नावलौकिकाचा विषय होऊ शकत नाहीत. त्यापेक्षा सर्वाधिक उद्योग असलेला सर्वाधिक भांडवल असलेला आणि मग त्यातूनच जगातील आर्थिक महासत्तेच्या स्पर्धेत असलेला देश म्हणून भारताची ओळख होणे हे जास्त महत्त्वाचे ठरते. रिलायन्स इंडस्ट्रीबरोबरचा आरामको कंपनीचा प्रस्तावित करार हा यासाठीच महत्त्वाचा ठरतो सध्या सर्वात मोठा लोकशाहीवादी देश म्हणून सगळे राजकारणी आपल्या स्वार्थाचा डांगोरा पिटत आहेत. निवडणुकीच्या धामधुमीत सगळे राजकारणी स्वतःची पाठ थोपटून घेत आहेत. परंतु जगाच्या स्पर्धेमध्ये किंवा एकूणच समाजजीवनाची प्रतिष्ठा जपण्यासाठी तो देश आणि समाज हा आर्थिकदृष्ट्या संपन्न असणे अधिक महत्वाचे ठरते. सध्या निवडणुकीच्या बाजारगप्पांमध्ये देशाची आर्थिक किंवा उद्योग व्यवस्थेला बळ देणारी ही बातमी याच राजकारण्यांकडून दुर्लक्षित होण्याची शक्यता आहे. या जगातील दोन मोठ्या कंपन्यांचे छोट्या मोठ्या प्रमाणात एकत्र येणे भारतासाठी वैशिष्ट्यपूर्ण म्हणता येईल. अर्थात यानिमित्ताने एक गोष्ट पुन्हा प्रकाशात येते रिलायन्स इंडस्ट्री ही जर जगातील दुसऱ्या क्रमांकातील तेलशुध्दीकरण करणारी कंपनी ठरत असेल तर कोकणातल्या नाणार प्रकल्पासाठी परदेशी कंपनीला कशासाठी आमंत्रण दिले गेले होते हे स्पष्ट व्हायला हरकत नाही.